# दिनांक १७.१०.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक १७.१०.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. आयुक्त ,महानगरपालिका, अमरावती

मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती ( यांचे प्रतिनिधी )

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती

मा. अभियंता, (म.जी.प्रा.) अमरावती

मा.श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती

मा.श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ अमरावती

मा.श्री.विलास देशमुख,वृक्ष तज्ञ,अमरावती

उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

**दि.१७.१०.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत**

## झोन क्र.१

सदर सभेमध्ये वृक्ष तोडणे/फांद्या तोडणे बाबत झोन क्र.१ कडून कुठलेही अर्ज प्राप्त नाही.

## झोन क्र.२

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | सिस्टर एल्सी सेबासटीयन होलीक्रॉस इंग्रजी प्राथमिक शाळा,इर्विन चौक,अमरावती | कडूनिंब वाळलेले पेल्ट्रोफार्म वृक्षाच्या फांद्या | ०२ | दिनांक १५/१० /२०२५ रोजी मा. वृक्ष अधिकारी यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला अर्जदार सिस्टर एल्सी मॅडम यांची भेट घेऊन त्यांचाशी चर्चा केली असता होलीक्रॉस इंग्रजी प्राथमिक शाळा इर्विन चौक,अमरावती येथील शाळेच्या परीसरा मधील बरेच वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार आहे.शाळेच्या ग्राउंड परिसरा मधील १ कडूनिंब पूर्ण वाळलेले आढळून आले तसेच १ | **वाळलेले झाड काढण्यास हरकत नाही. फांद्या काढता येणार नाही** | **पेल्ट्रोफार्म प्रजातीचे वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. कडूनिंब वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पेल्ट्रोफार्म वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या टीन शेड वर झुकलेल्या आढळून आल्या आहे.शाळेच्या विद्यार्थ्यांचा सुरक्षतेचा दृष्टीकोन बघून अर्जदाराला १ कडूनिंब वृक्ष वाळलेले व १ पेल्ट्रोफार्म वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.नियमानुसार १ कडूनिंब वृक्ष वाळलेले व १ पेल्ट्रोफार्म वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी तात्काळ द्यावी लागेल.उचित निर्णयास सादर . | | **आहे.** |
| २. | १.सौ.सोनाली नितीन हिरुळकर २.श्री नितीन रमेश हिरुळकर ३.श्री. राजेश अमरलाल तलरेजा राजापेठ अमरावती १.श्री सुधिर हरणे २.श्रीप्रदिप पाटिल३. श्री आशिष कडु | आडजात वृक्ष | ०१ | न्यायालयात प्रकरण दावा ३९/२०२५ व दावा ४०/२०२५ नुसार न्याय प्रविष्ठ असतांना १०० वर्षे जुने झाडांची कत्तल केल्याबाबत गैरअर्जदार -१) श्री अनुराग आशिष मालु २) आशिष रमेशचंद्र मालु ३) विजय शंकरसा मामर्डे ४) सयोगिता विजय मामर्डे५) राहुल दिलीप बजाज ६) अजय धनराज खंडेलवाल रा- जयराम नगर राजापेठ अम. मालमत्तेचे वर्णन - मौजे राजापेठ प्रगणे बडनेरा सर्व्हे नं. २६/१ मधिल प्लॉट नंबर ५८. सदर प्रकरणी दि.०१/०४/२०२५ रोजी मा .तांत्रिक सदस्य यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले होते.तेव्हा सदर जमिनीवर कोणतीही वृक्ष तोड झाल्याचे आढळून आले नव्हते,तसेच उद्यान विभागाचा दि .२१/०३/२०२५ चा अहवाल पहावा. सदर प्रकरणी आपसी जमिनीचा वाद असल्याचे दिसून आले तक्रार करत्यास कुठले वृक्ष तोडले हे सांगण्यासाठी फोन करून बोलवले असता ते हजर झाले नाही ,तसेच सदर प्रकरणी ससनर विभागाने बांधकाम परवानगी सदर जागेची कुणालाही दिली नसल्याचे अहवालात म्हटले आहे. सबब वृक्ष तोड प्रकरणाची तक्रार नस्ती करण्यात यावी असे माझे मत आहे.उचित निर्णयास सादर.. | **सदर ठिकाणी चौकशी केली असता कुठलेही पुरावे सापडले नाही व आपसी वाद दिसून आला आहे.** | **सदर प्रकरण नस्ती बंद करण्यात यावे.** |
| ३. | श्री. मिलिंद रघुनाथ जोशी c/o पनपालिया जोशी कॉलनी अम | अवैध वृक्ष तोड कडुनिंब सुबाभुळ | | दिनांक १२/०३/२०२५ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा ठराव क्रं.११ नुसार विना परवानगी तिन वृक्ष तोडल्याप्रकरणी नियमानुसार १x२०००० रु. या प्रमाणे ३x२००००= ६००००रु. दंड रक्कम भरना करण्यास नोटिस देण्यात आली आहे. त्यानुसार अर्जदार यांनी दि. १५/०४/२०२५ रोजी विनंती अर्ज या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. अर्जदारांचा खुलासा दि.१३/०५/२०२५ रोजी वृक्ष प्राधिकरण समिती समोर ठेवण्यात आला होता .ठराव क्र .३ अन्वये अर्जदाराचा खुलासा फेटाळण्यात येत आहे. तसेच दि.१९/०३/२०२५ रोजी दिलेल्या नोटीस नुसार ६०,०००/- दंड रक्कम भरण्यात यावी | **नोटीस व स्मरण पत्र १ ,२ ,३ देण्यात आले आहे. खुलासा प्राप्त झाला नाही.** | **दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | याबाबत नोटीस व स्मरण पत्र १ ,२ ,३ देण्यात आले आहे. यानुसार विहीत कालावधीमध्ये आज पर्यंत दंड रक्कमेचा भरणा करून पावतीची छायांकित प्रत या कार्यालयात प्राप्त करून देण्यात आलेली नाही . सदर अर्जदार यांच्या मालमत्ता करात दंड रक्कम समाविष्ट करावी लागेल. पुढिल कार्यवाही करीता उचित निर्णयास सादर. | | |

## झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. प्रकाश गजभिये रा.प्रभू कॉलोनी | खंडूचक्का | १ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरातील खंडूचक्का झाडाच्या फांद्या घरावर व विद्युत तारांवर वाढलेल्या आहेत. विद्युत तारेंवरील २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | श्री. रवींद्र मरोडकर रा. साधना कॉलोनी | वड | १ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घराबाहेर रोड च्या बाजूला वडाचे चे झाड छान वाढलेले आहे. त्याच्या फांद्या रोडवर व विद्युत तारेंवर पसरलेल्या आहेत. सदर बड वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | श्री. माधव हरडे रा. महावीर नगर | बदाम | १ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घराबाहेर रोड च्या बाजूला बदाम चे झाड छान वाढलेले आहे. त्याच्या फांद्या विद्युत तारेंवर पसरलेल्या आहेत. सदर बदाम वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या रोडवरील व विद्युत तारेंवरील फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्रीमती श्रेया पांडे रा. हरिओम कॉलोनी | १ कडूनिंब १ कॅशिया | २ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घराबाहेर रोड च्या बाजूला कडूनिंब व कॅशिया चे झाड छान वाढलेले आहे. त्याच्या फांद्या विद्युत तारेंवर पसरलेल्या आहेत. सदर दोन्ही वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या रोडवरील व विद्युत तारेंवरील फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री. अनिरुद्ध दिक्षित रा. प्रमोद कॉलोनी | कडूबदाम | १ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घराबाहेर रोड च्या बाजूला कडूबदाम चे झाड छान वाढलेले आहे. झाडाच्या पानांवर रोग पसरला आहे. झाडाच्या काही फांद्या अर्जदार यांच्या घरावर गेलेल्या आहेत. करिता सदर वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या समतोल फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री. चंद्रकांत कुलकर्णी रा.जयंत कॉलोनी अम. | १ कडूनिंब १ बुच | २ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरामागील बाजूला कडूनिंब व बुच चे झाड छान वाढलेले आहे. त्याच्या फांद्या अर्जदार यांच्या घरावर व सोलर पॅनेल वर पसरलेल्या आहेत. सदर दोन्ही वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | श्री. संजय शामकुंवर रा.छत्रपती नगर अम. | २ कडूनिंब १ पिंपळ | ३ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरा बाजूच्या सर्विस गल्ली मध्ये व मंदिराला लागून कडूनिंब व पिपळ चे झाड छान वाढलेले आहे. त्याच्या फांद्या अर्जदार यांच्या घरातील खिडकीवर व मंदिरावर गेलेल्या आहेत. करिता एक कडूनिंब वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष छान व हिरवेगार असल्याने फांद्या काढता येणार नाही.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ८ | श्री. विनायक पटवर्धन रा. ग्रीनपार्क सोसायटी | सागवान<br>बुच<br>आंबा | ८<br>१<br>१ | दि.१०/१०/२५ होजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरातील आवारात भरपूर मोठी वृक्ष आहेत. अर्जदार वृक्षप्रेमी आहेत. त्यांच्या आवारात १५-१६ सागवान वृक्ष आहेत. त्यापैकी परीपक्र झालेली ७० से.मी.चे वर व्यासाचे ८ सागवानची झाडे तोडण्याची परवानगी नियमानुसार ठेव घेवून देण्यास हरकत नाही. तसेच एक मोठे बुच ने आड कम्पाउंड ला लागून आहे त्याच्या वरील भागातील २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. एक आंबा वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्ष छान व हिरवेगार असल्याने फांद्या काढता येणार नाही.** | **परीपक्व असलेली ८ सागवान वृक्ष नियमानुसार १:१ प्रमाणे ठेव रक्कम स्वीकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. बुच या प्रजातीच्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. आंबा वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ९ | श्री. संदीप पाटील रा. | गुलमोहर | १ | दि.१०/१०/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदार यांचे जागेत १ गुलमोहर झाड फार मोठे | **सदर जागेची जागेबाबतची पाहणी करून** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अंबिका नगर | बोर | १ | आहे त्याचा वरचा घेर अंदाजे ५० फुट वाढलेला आहे. वृक्ष चौकात रहदारी रस्त्यावर असून झाडाखाली मार्केट व दुकाने आहेत. मार्केटचे बांधकाम फार जुने विटाचे व टीन चे आहे. संपूर्ण मार्केट गुलमोहर वृक्षाच्या फांद्यांनी व्यापलेले आहे. सदर वृक्ष कच्चा असल्याने फांद्या दुकानावर पडतात तसेच दुकानाला तडे गेलेले आहेत. करिता भविष्यातील अनर्थ टाळण्याकरिता संपूर्ण झाड काडणे आवश्यक आहे. तरी अर्जदार यांना गुलमोहर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बोर वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | **चौकशी अहवाल पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.** | **येत आहे. संपूर्ण वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.फेर स्थळ निरीक्षण करण्यात यावे व प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |
| १० | गैर-अर्जदार प्राचार्य श्रीमती नरसम्मा कॉलेज किरण नगर अम. | विना परवानगी वृक्ष तोडले | ९ वृक्ष | गैर-अर्जदार प्राचार्य श्रीमती नरसम्मा कॉलेज, किरण नगर यांच्या द्वारे संचालित सरस्वती शिशु विहार येथील परिसरात वृक्ष तोडल्या बाबत तकार प्राप्त होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने परीसराची पाहणी केली असता परिसरात बांधकाम सुरु असून बांधकामात येणारी ९ मोठी वृक्ष पूर्णपणे तोडलेली आढळली व एक कडूनिंब वृक्ष अर्धवट तोडलेला दिसला. करिता गैर-अर्जदार यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्या बाबत दि.२९/०१/२५ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्या नोटीस चा खुलासा गैर-अर्जदार यांनी दि.०६/१०/२५ रोजी पुढील प्रमाणे केला आहे. आमच्या संस्थेच्या परिसरात शिशुबाटीका, श्रीराम पंचायतन मंदिर व ५०० आसनाचे सभागृह निर्माण परिसर आहे. या परिसरात सभागृहाचे बांधकाम सुरु आहे. सभागृह मोठे असल्याने बांधकाम साहित्य क्रेनद्वारे पोहोचविण्यास अडचण निर्माण होत असल्याने परिसरातील झाडे अनावधानाने तोडण्यात आली. आमच्या परिसरातील काही झाडे वाकलेली होती, केव्हातरी पडणार होती त्यामुळे त्यातील काही झाडे बुडापासून कापणे असता. आवश्यक होती कारण परिसरात लहान मुलांची शिशुवाटीका आहे. परिसरातील झाडे असल्याने परवानगी घेणे आवश्यक होते याबद्दल आम्हाला माहिती नव्हती बांधकाम पूर्ण झाल्यावर त्या ठिकाणी सुशोभीकरणासाठी बगीचा तयार करण्याचा आमचा हेतू आहे. आमच्या परिसरात दरवर्षी विविध सामाजिक संघटना कडून विविध प्रवर्गातील झाडांचे वृक्षरोपण करून त्याचे स्वरक्षण व संवर्धन केल्या जाते. आमच्या परिसरात ८,००० चौ. फुट जागेत | **सदर प्रकरणी अवैध वृक्ष तोड झाल्याचे गैर-अर्जदार यांचे कडून कबुल झाले आहे.** | **अवैधवृक्ष तोड केल्या बाबत अवैध वृक्ष तोड बाबतचे धोरणाचे अधीन राहून २०,०००/- रु.प्रती वृक्ष या प्रमाणे ९ झाडांकारीता १,८०,०००/- रु. ची दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वन औषधीचा बगीचा तयार करण्यात आला आहे. आमच्या कडून तोडलेल्या झाडमध्ये लहानमोठी झाडे होती. झाडे तोडणे आमचा हेतू नव्हता, परंतु बांधकामामध्ये अडचण निर्माण होत असल्याने ती झाडे तोडण्यात आली. त्याबद्दल क्षमस्व आपण जो दंड आकाराल तो भरण्यास आम्ही तयार आहोत. तसेच पुढील नियोजनाचे दृष्टीने काही झाडाच्या फांद्या तोडवयाच्या आहेत व काही झाडे पूर्णता तोडावयाची आहेत.तरी आपणास विंनती करण्यात येते कि आपण स्वत मोक्यावर भेट देऊन आम्हाला अडचणीची झाडे तोडण्याची मान्यता द्यावी व तोडलेल्या झाडांची कार्योत्तर मान्यता देण्यात यावी. या बदल्यात आम्ही नियमानुसार नवीन वृक्ष लावणार याची हमी देतो. उचित निर्णयास्तव सादर | | |
| ११ | गैर-अर्जदार श्रीमती शकुंतला भोवते रा.भोवते ले-आऊट अमरावती. | जांभूळ कडूनिंब | २ | सदर प्रकरण दि. १९/०९/२५ च्या मागील सभेत ठेवण्यात आले होते. त्या सभेतील ठराव क्र.०९ नुसार प्रकरण या सभेत ठेवण्यात येत आहे. सदर प्रकरणात गैर-अर्जदार श्रीमती शकुंतला भोवते रा. भोवते ले-आऊट यांनी त्यांच्या घरातील परिसरात असलेले एक कडूनिंब वृक्ष विनापरवानगी तोडले होते. त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती. मागील सभा दि. १८/०७/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २८ नुसार २०,००० रुपये दंड करण्यात आला होता, त्याबाबत त्यांनी दंड कमी करण्याबाबत अर्ज केला आहे. त्यामध्ये त्यांनी वृक्ष अवाढव्य वाढल्याने वृक्षाच्या फांद्या विद्युत तारांबर व घरावर येत होत्या. मी वयोवृद्ध महीला असून माझे पती मरण पावले आहे. माझ्या हृदयाची शस्त्रक्रिया झाली आहे. माझ्या जवळ माझा लहान नातू राहतो तो बाहेर खेळतो. वृक्षाच्या फांद्या अंगावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव कडूनिंब चे झाड तोडण्यात आले. या बाबीचा सहानुभूती पूर्वक विचार करून मला दंड कमी करण्यात यावा ही विनंती. उचित निर्णयास्तव सादर | **अर्जदारास पत्र देण्यात यावे.** | **अर्जदाराने अपील केल्यास सुनावणी घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.** |
| १२ | गैर-अर्जदार श्रीमती सुशीला मेथाम रा.लुंबिनी नगर अम. | पिंपळ | १ | सदर प्रकरण दि. १९/०९/२५ च्या मागील सभेत ठेवण्यात आले होते. त्या सभेतील ठराव क्र. १० नुसार प्रकरण या सभेत ठेवण्यात येत आहे. सदर प्रकरणात गैर-अर्जदार श्रीमती सुशीला मेश्राम यांनी विना परवानगी एक पिंपळ वृक्ष तोडून फक्त खोड शिल्लक ठेवले होते त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती. त्यांचा खुलासा मागील सभा दि. १८/०७/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २७ नुसार अमान्य करून २०,००० रुपये दंड करण्यात आला. | **अर्जदारास पत्र देण्यात यावे.** | **अर्जदाराने अपील केल्यास सुनावणी घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | त्यावर त्यांनी पुन्हा अर्ज केला असून त्यामध्ये त्यांनी मी अज्ञान असल्याने मला वृक्ष तोडण्याची परवानगी काढावी लागते याची माहिती नव्हती. माझ्या कडून चूक झाली आहे. माझी परिस्थिती अत्यंत हलाखीची असून मला रमाई आवास योजनेचा घरकुल बांधण्याकरिता निधी मिळाला आहे. माझ्या चुकीची भरपाई म्हणून १० वृक्ष लाऊन देते व त्याचे पालन पोषण करते. करिता मला माफ करून दंड माफ करण्यात यावा ही विनती. उचित निर्णयास्तव् सादर. | | |
| १३ | तक्रारदार श्री. तेजस गुर्जर रा.प्रभू कॉलोनी अम. | | | सदर प्रकरणात तक्रारदार श्री. तेजस गुर्जर हे प्रभू कॉलोनी येथे राहतात. त्यांच्या घरामागील मोकळ्या जागेतील झाड तोडल्या बाबत त्यांनी आपले सरकार पोर्टलवर online तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. तांत्रिक सदस्य यांच्या मार्फत पाहणी करून पुढील प्रमाणे अहवाल सादर केला आहे. दि.१०/१०/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून असे निदर्शनास आले कि,श्री. गुर्जर यांनी त्यांच्या घरामागील खुल्या प्लॉट वरील झाडे तोडल्याची तक्रारीत सांगितले. प्रत्यक्षात घरामागील जागा २ ते ३ एकराची आहे असे समजले. त्या जागेची केस न्यायालयात होती, त्याचा आता निकाल लागला त्यामुळे जागा मालकाने त्या जागेवरील झुडपीझाडे काढून स्वच्छ केले. कदाचित लहानमोठी १-२ झुडपीझाडे असतील. प्रत्यक्षात अर्जदारासोबत बोलणे झाले आहे त्यामुळे तक्रार निरस्त करण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **सदर जागेचे फेर स्थळ निरीक्षण करण्यात यावे,** | **सदर जागेबाबत tree census survey पोर्टलमध्ये झाड verify करण्यात यावे करिता सदर जागेचे GEO-TAG फोटो उद्यान विभागास उपलब्ध करून देण्यात यावे व प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |

# झोन क्र.४

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **१** | मुख्याधापिका, हॉलीक्रॉस स्कूल नवीवस्ती,बडनेरा | **कडूनिंब** | **१** | **दि. १०/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.** **तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** हॉलीक्रॉस स्कूल नवीवस्ती,बडनेरा येथील परिसराला प्रत्यक्ष भेट दिली आहे.शाळेच्या आवारात व कंपाउंडला भरपूर प्रमाणात व फार जुनी कडूनिंबाची झाडे आहेत बऱ्याच | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **कादुनिम्बाची १०० से.मी.पेक्षा मोठी असलेली अडथळा करणारी फांदी काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | झाडांच्या फांद्या १ बाजूला झुकलेल्या आहे शाळेच्या पटांगणात लहान मुलांचा वावर असल्यामुळे झुकलेल्या फांद्या पडून अपघात होण्याची भीती संभवते. मुख्याधापिका यांचे अर्जानुसार शाळेच्या आवारात मध्यभागी १ फार मोठी कडूनिम्बाची फांदी तिरपी वाढलेली असून तिच्या वजनामुळे झाडांच्या तोल डाव्या बाजूने पूर्ण झाड मुळासकट पडण्याची भीती आहे.करिता तिरपी फांदी अंदाजे १०० से.मी. पेक्षा मोठी कापण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. तसेच रस्त्यावर झुकलेल्या इतर वृक्षांच्या २ टे ४ इंच व्यासाची कापण्याची परवानगी देण्यात यावी.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | | |
| २ | श्री.एम.डी.हिरुडकर<br>अकोली रोड,<br>साईनगर,<br>अमरावती | **गुलमोहर** | १ | **दि. १०/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.**<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** गुलमोहर वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्ताच्या कडेला वाढलेला आहे. काही फांद्या रस्त्यावर विद्युत तारावर झुकलेल्या आहेत.रस्ता रहदारीचा असल्यामुळे व झाड गुलमोहराचे हवेमुळे फांद्या रोडवर पडून अपघात संभवतो. करिता गार्डन विभागाकडून रस्त्यावर झुकलेल्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या कापण्याची परवानगी देण्यात यावी.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | राजू वामनराव चौधरी<br>रा.गोपाल नगर, अमरावती | **कडूनिंब १<br>जांभूळ १** | २ | **दि.१०/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.**<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** श्री.चौधरी यांचे घराचे आवारात १ कडूनिंब व १ जांभूळ झाड अस्ताव्यस्त वाढलेले आहे कडूनिंबच्या फांद्या रोडवर व विद्युत तारेवर आलेल्या आहेत. जांभूळचे झाड ठिसूळ असल्यामुळे दोन्ही झाडांच्या वरच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या समतोल फांद्या छाटण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | श्री.भाऊराव सरकटे रा. नालंदा कॉलोनी. साईनगर ,अमरावती | **सुईबाभूळ** | १ | **दि.१०/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.** **तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** तक्रारदार श्री. सरकटे यांनी समोरील खुल्या प्लॉटमधील सुबाभळीचे झाड पूर्ण कापण्याची परवानगी मागितली आहे.काटेरी झाड असल्यामुळे शेजारील घरांना त्याचा त्रास होत आहे.करिता प्रत्यक्ष प्लॉट मालकाची ना हरकत सहज उपलब्ध असल्यास सादर करूनच सदर काटेरी सुबाभळीचे झुडूप व झाड काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. **अहवालानूसार वृक्ष काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | जागामालकाची NOC प्राप्त करून घेणेबाबत पत्र देण्यात यावे. | **जागामालकाची NOC प्राप्त झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |
| ५ | श्री.वासुदेव नामदेवराव बारस्कर रा.प्रोफेसर कॉलोनी, नवीवस्ती, बडनेरा | **वाळलेले वृक्ष** | २ | **दि.१०/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.** **तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** मनपा उद्यानातील दोन वृक्ष १ मोठा व १ लहान पूर्णपणे वाळलेले आहेत ती वाळलेली झाड रस्त्यावर अथवा समोरील घरावर पडू नयेत म्हणून श्री. बारस्कर यांनी वाळलेली झाडे कापण्याकरिता अर्ज केला आहे वाळलेला मोठा वृक्ष त्वरित काढणे आवश्यक आहे करिता उद्यान विभागाकडून वाळलेला १ मोठा व १ लहान वृक्ष त्वरित काढण्याकरिता परवनगी देण्यास हरकत नसावी. **अहवालानूसार वाळलेले २ वृक्ष काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | वाळलेले वृक्ष काढण्यास हरकत नाही. | **वाळलेले २ वृक्ष उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री. प्रज्वल प्रनमजी मालू. रा. मौजे सातुर्णा सर्वे क्र २८/३ | कडूनिंब ६ पिंपळ १ आडजात ८ | **१५** | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** सदर प्रकरणावर यापूर्वी सभा दि ०२-०९-२५ रोजीचे मंजूर ठराव क्र.८ नुसार अर्जदारास प्रस्तावित १५ वृक्षांची यादी मागविण्यात आली होती त्यानुसार अर्जदारांनी यादी सादर केलेली आहे तसेच स.सं.न.र विभागाकडून मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झालेला आहे.अहवालावर मा.तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे. **तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** दि.२९-०८-२०२५ रोजीचे अहवालानुसार अर्जदाराने बांधकामात येणाऱ्या वृक्षांची तसेच एकूण परिसरातील वृक्षांची यादी सादर केलेली आहे. तसेच स.स.न.र. विभागाने एकूण १५ वृक्षांपैकी १४ वृक्ष सदर बांधकामात येत असल्याचे आपल्या अहवालात नमूद केले असल्याचे दिसून आले. सबब बांधकामात येणारी १४ वृक्ष (ज्यात कडूनिंब वृक्ष६,पिंपळ१,आणि७आडजात) वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार बदली वृक्ष | प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्ष काढण्यास हरकत नाही. | **नियमानुसार १:३ प्रमाणे ठेव रक्कम स्विकारून वृक्ष लावण्याचे अटीवर १४ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लागवडीची ठेव स्वीकारून देण्यास हरकत नाही.<br>**अहवालानूसार १४ वृक्ष काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | | |
| ७ | तक्रारदार श्री.परिक्षीत दिवाकर कातखेडे रा.गोपाल नगर, अमरावती | **निरगुडी** | १ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार १) श्री.संजय हरडे २)श्री.सुर्यकांत बोबडे ३) प्रवीण अलटकर रा. गोपाल नगर यांना प्राप्त तक्रारीनुसार अवैध वृक्षतोड केल्याबाबत या कार्यालयाचे जा.क्र.४५११ दि.०६-१०-२०२५ रोजीचे खुलासाचे पत्र देण्यात आले होते.त्यानुसार गैरअर्जदारांनी या कार्यालायात दि.०८-१०-२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे.सदर खुलासावर मा.तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.<br>**दि.१५/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.**<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** काढण्यात आलेला वृक्ष वाळलेला होता असे दिसूल आले त्याची तक्रार गैरअर्जदारांनी पूर्वीच विद्युत विभागाकडे केली होती असे दिसून आले. कोणतीही अवैध वृक्षतोड झालेली दिसून येत नाही शेजारी वाद आढळून आला सबब प्रकरण नस्ती करण्यात यावे.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस सविनय सादर** | **सदर जागेचे फेर स्थळ निरीक्षण करण्यात यावे,** | **सदर जागेबाबत tree census survey पोर्टलमध्ये झाड verify करण्यात यावे करिता सदर जागेचे GEO-TAG फोटो उद्यान विभागास उपलब्ध करून देण्यात यावे व प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |
| ८ | राजेंद्र शंकरराव जाधव, सातुर्णा अमरावती | विविध प्रजातीचे | - | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** सदर प्रकरणामध्ये सभा दि.०१-०८-२०२५ रोजीचे ठराव क्र ४ नुसार अर्जदारास विविध प्रजातीच्या वृक्षांची बांधकामात अडचण होणाऱ्या २-४ इंच व्यासाची फांद्या काढण्याची परवानगी देण्यात आली होती.<br>परंतु श्री.नितीन मोहोड यांनी दि. ०९-०९-२०२५ रोजी यांच्या भ्रमणध्वनीद्वारे दिलेल्या तक्रारीनुसार अर्जदारांनी त्यांच्या आवारातील पिंपळ वृक्षाची मोठ्या फांद्या काढल्याची माहिती दिली त्यानुसार सदर जागेवर प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली त्याबाबतचे geo tag फोटो काढण्यात आले.त्यानुसार अर्जदारास याबाबत खुलासाची नोटीस जा.क्र.४३५४ दिनांक<br>२४-०९-२०२५ रोजीचे देण्यात आली.अर्जदाराचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.** | **सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या अवैधपणे वृक्ष तोड झाल्याचे दिसून आले आहे.व त्यास नोटीस देण्यात आली आहे.** | **वृक्षाच्या फांद्या अवैधपणे तोडल्याबाबत अवैध वृक्ष तोड बाबतचे धोरणाचे अधीन राहून २०,०००/- रु.प्रती वृक्ष या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.** |

## झोन क्र.५

सदर सभेमध्ये वृक्ष तोडणे/फांद्या तोडणे बाबत झोन क्र.५ कडून कुठलेही अर्ज प्राप्त नाही.

## वेळेवरील विषय

## झोन क्र.४

**विषय क्र.१ :-**

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मुख्याध्यापक एस एल पब्लिक स्कूल जुनिवास्ती बडनेरा | महारुख | १ | दि. २९/०८/२०२५गेजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल महारुख वृक्ष मार्वजनिक जागेवर ज्याचे कडेला छान वाढलेल्या व हिरवागार आहे सदर महारुख वृक्षाच्या फांद्या पूर्वीच काढण्यात आल्या असून खोडला आता पालवी फुटल्याचे दिसुन येते. वृक्षाला लागलेळी किडीचे नमुने घेण्यात आले असुन प्रयोगशाळांचे अहवाल प्राप्ती नन्तर वृक्ष काढण्यायाबाबत किंवा कसे ? यावर विचार करता असे अहवाल सभेमध्ये ठेवण्याट आले होने. सदर वृक्षाचे प्रयोगाचे अहवाल मा. तांत्रिकसदस्य मार्फत दि.१८-०१-२०२५ रोजी प्राप्त झालेले आहे. अहवालामध्ये वृक्षाला किडापासून कोणताही धोका नसल्याचे सांगितलेले आहे. सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीम सादर | **वृक्षाला किडापासून कोणताही धोका नसल्याचे सांगितलेले आहे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

उद्यान विभाग

**विषय क्र.२ :- वृक्षा संबंधी वृत्तपत्रात जाहिरात देणे बाबत तसेच झाडाच्या ठळक भागावर नोटीस लावणे बाबत**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या प्रकरण ५ चे कलम २ व ३ नुसार झाड तोडायचे झाल्यास त्याबाबतीत परवानगी साठी लेखी अर्ज करतील अर्जासोबत जे झाड तोडायचे आहे त्याचे वर्णन व स्थिती दर्शविण्याबाबतचा नकाशा आणि ते झाड तोडण्याची कारणे अर्जासोबत जोडणे असा अर्ज प्राप्त झाल्यास वृक्ष प्राधिकरण वृक्ष अधिकाऱ्यास झाडांचे व्यक्तिश: निरीक्षण करण्यास आणि असा मिळाल्यास आवश्यक कालावधीत चौकशी करून वृक्ष प्राधिकरणकडे अहवाल सादर करण्यास सांगेन.वृक्ष अधिकारी हे स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून तसेच तोडणे आवश्यक असलेल्या झाडाच्या ठळक भागावर नोटीस चीपकवून योग्य ती जाहीर नोटीस देईल.त्यानंतर वृक्ष प्राधिकरण अर्ज मिळाल्याच्या दिनांका पासून ४५ दिवसाच्या कालावधीत सशर्त किंवा विनाशर्त परवानगी देऊ किंवा ती नाकारू शकेल तथापि अशी परवानगी देण्यात आल्यानंतर १५ दिवसापर्यंत कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही.

परंतु वृक्ष प्राधिकरणच्या मते ते झाड मेलेले असेल किंवा त्यावर रोग पडलेला असेल किंवा वादळाने झाड पडले असेल किंवा वृक्षामुळे जीवतास किंवा मालमत्तेस धोका असल्यास तसेच वाहतुकीस अडथळा होत

असल्यास अश्या परवानगी विरुद्ध कोणताही आक्षेप घेतला असेल तर हि बाब पुनर विचारासाठी वृक्ष प्राधिकरण समोर मांडण्यात येईल ज्यांनी आक्षेप घेतला असेल अश्या व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्या नंतर २ आठवड्याच्या आत निर्णय घेता येईल.

वरील प्रमाणे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ५ मध्ये प्राप्त अर्जावर कार्यवाही करणे अपेक्षित असून यासंबंधी वृक्ष प्राधिकरण सभेच्या निर्णयास्तव सादर

**झालेली चर्चा – सदर बाबत अध्यक्ष महोदय वृक्ष प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झोन निहाय प्राप्त होणारे वृक्ष तोडी बाबतचे अर्ज यांची संपूर्ण यादी तयार करून महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करून त्याबाबतचा स्थानिक वृत्तपत्रात संकेत स्थळावर वृक्षतोडी बाबत यादी प्रसिद्ध केली असल्याचे जाहिरात देण्यात यावी.त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.**

**ठराव – वृक्ष प्राधिकरणाच्या सभेमध्ये सदर विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.**

आयुक्त
महानगरपालिका, अमरावती